**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १७ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण.**
2. **येत्या चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील अशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत माहिती.**
3. **अमरावती जिल्ह्यातील मोझरी क्षेत्रात मूलभूत सुविधा निर्माण विषयक बैठक लवकरच घेणार - उपमुख्यमंत्री अजित पवार.**
4. **नागपुरात आज पावसाची हजेरी, उकाड्यापासून किंचित दिलासा.**

---

**स्वच्छ सर्वेक्षण**

स्वच्छता हा देशाच्या सांस्कृतिक जाणिवेचा पाया असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज २०२४-२५ या वर्षासाठी स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते वितरीत करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांचं कौतुक करताना राष्ट्रपतींनी, 'स्वच्छ सर्वेक्षण' हा एक यशस्वी उपक्रम असल्याचं नमूद केलं. इंदूरने सलग आठव्या वर्षी देशातलं सर्वात स्वच्छ शहर होण्याचा मान कायम राखला आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात इंदूरला पहिल्या क्रमांकाचा, सुरतला दुसऱ्या, तर नवी मुंबईला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तीन ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांसाठीच्या 'स्वच्छ शहर' श्रेणीत महाराष्ट्रातलं मीरा-भाईंदर, छत्तीसगढ मधल्या बिलासपूर, आणि झारखंड मधल्या जमशेदपूर शहराला गौरवण्यात आलं. या कार्यक्रमादरम्यान विविध श्रेणींमध्ये एकूण ७८ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

---

**माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव**

देशातील दहा लाख नागरिकांना एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेचं प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची घोषणा, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ते नवी दिल्ली इथं 'सामान्य सेवा दिवस-डिजिटल भारताची दहा वर्षे' या कार्यक्रमात बोलत होते...

***(होल्ड बाईट-माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव)***

***एआय मिशन है अपना बहुत अच्छा उस एआय मिशन के तहत हम लोगों ने टार्गेट लिया है करीब दस लाख लोगों को एआय स्किल्स में तयार करेंगे. उसमे साडेपाच लाख VLE's अपने है, आप सब को सबसे पहले उसमें प्रीफरन्स दि जायेगी.***

या प्रशिक्षणासाठी ग्रामीण स्तरावरच्या उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.युपीआय पेमेंटची संख्या व्हिसाच्या पेमेंटहून जास्त झाल्याचं सांगत डिजिटल भारत ही संकल्पना आणि त्याचे लाभ घराघरापर्यंत पोचवण्यासाठी सामान्य सेवा केंद्रातील कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या कष्टांचा त्यांनी गौरव केला. आयआरसीटीसी सेवा नागरिकांपर्यंत पोचवण्यासाठी पुढे येण्याचं आवाहन वैष्णव यांनी यावेळी ग्रामीण उद्योजकांना केलं.

-----------------------------------------------

**निवडणुका**

ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्यामुळे या निवडणुका आतापर्यंत झाल्या नाहीत. येत्या चार महिन्यांत या निवडणुका होतील असं शिंदे यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------------------------

**परिवहन महामंडळ**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना दिल्या जाणाऱ्या सवलतीत लवकरच सुधारणा केली जाणार आहे. तसेच काही नवीन सवलती देखील लागू करण्याचा प्रस्तावही शासन पातळीवर विचाराधीन असून, याबाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

-----------------------------------------------

**अशोक उईके**

राज्यातील आदिवासी आश्रम शाळेतील कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज विधानपरिषदेत दिली.सदस्य किरण सरनाईक यांनी आदिवासी आश्रम शाळेत 'काम नाही वेतन नाही' नियम लागू असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. याला उत्तर देताना मंत्री उईके बोलत होते. आदिवासी आश्रमशाळेतील काम नाही वेतन नाही या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत विशेष बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री उईके यांनी सांगितले.

-----------------------------------------------

**पदोन्नतीद्वारे भरती**

राज्य उत्पादन शुल्क विभागातील मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षा दुय्यम निरिक्षक (गट -क) पदासाठी सध्या सुरु असणाऱ्या भरती प्रक्रियेत बदल करण्याबाबत विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट करत दुय्यम निरीक्षकांची पदोन्नतीद्वारे होणारी पुढील भरती शंभर टक्के जवानांमधून केली जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना दिली. यापुढे या पदावरील भरती नामनिर्देशन व पदोन्नती या मार्गांनी ५०:५०टक्क्यांच्या प्रमाणात केली जाणार असून, पदोन्नतीद्वारे होणारी सर्वच भरती जवान संवर्गामधून करण्यात येणार आहे.

---

**हनिट्रॅप**

राज्यातील अनेक वरिष्ठ अधिकारी आणि नेते हनिट्रॅपमध्ये अडकले असून, संवेदनशील, गोपनीय माहिती बाहेर गेली आहे. याबाबत सरकार गंभीर असून यावर कारवाई केली जाईल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत सांगितलं. कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. यावर या प्रकरणातली तक्रार मागे घेतल्याचं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी माध्यमांना सांगितल्याचा मुद्दा भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. त्यामुळे सरकार या प्रकरणी दिशाभूल करत आहे का असं जाधव म्हणाले. यावर सभागृहात गदारोळ झाला आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

---

**मोझरी विकास**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अमरावती जिल्ह्यातील मोझरी क्षेत्रात मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १५० कोटी रुपयांच्या मूलभूत विकास आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि या विकास आराखड्याअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या इमारतींपैकी तीन इमारती कोणाला हस्तांतरित करायच्या, त्यातील शैक्षणिक संकुल कोण व्यवस्थितपणे चालवू शकेल हे तपासून पाहण्यात येईल आणि यासंदर्भात संस्थेचे प्रमुख आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत पुढील १५ दिवसात बैठक घेऊन मार्ग काढण्यात येईल,अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

---

**तुकडेबंदी कायदा रद्द**

एक जानेवारी २०२५ पूर्वीच्या १ हजार चौरस फुटांवरील जमिनींना कायदेशीर मान्यता आता मिळणार आहे. राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत १९४७ चा तुकडेबंदी कायदा रद्द केला असून यासोबतच, कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरण आणि गौण खनिज चोरीविरुद्ध कठोर कारवाईसाठी नवीन कार्यपद्धती (एसओपी) तयार करणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवेदनाद्वारे सभागृहाला दिली. यावेळी त्यांनी कृत्रिम वाळू धोरणा बाबत माहिती दिली......

***(होल्ड बाईट - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे)***

***आणि एका जिल्ह्यामध्ये आपण 50 नवीन क्रशर देतो आहे एम-सँडचे आणि त्याची एसओपी का असावी म्हणजे काय पद्धती असावी, एक जर सांगितलं तर आता 600, रुपये रॉयल्टी आहे ती 200 रुपये रॉयल्टी असणार आहे. एम-सँडची म्हणजे फार आपण लिबरल त्यामुळे राज्यामध्ये एम-सँड कृत्रिम वाळू धोरणांची अंमलबजावणी करण्याबद्दलची कार्यपद्धती याबद्दलची एसओपी हि याठिकाणी आज या ठिकाणी या सभागृहामध्ये देतो आहे.***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तुकडेबंदी कायदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रहिवाशी क्षेत्रातील अनधिकृत तुकड्यांना अधिकृत करण्यासाठी पुढील १५ दिवसांत अपर मुख्य सचिव (महसूल) आणि संबंधित अधिकाऱ्यांद्वारे एसओपी तयार केली जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

---------------------------------------------------

**हवामान**

नागपपूरात आज पावसाने दुपारच्या सुमारास दमदार हजेरी लावली, यामुळे उकाड्यापासून किंचित दिलासा मिळाला आहे. गेल्या एक आठवड्यापासून पावसाने उघडीप दिली होती. जोरदार पावसामुळे शहरातील खोलगट भागात तसेच अंडर ग्राउंड रस्त्यावर देखील पाणी साचले. पावसाने दडी मारल्याने जिल्ह्याचा पारा 35 पार पर्यंत गेला होता. आज पुन्हा पावसाच्या आगमनाने वातावरणात बदल, नागरिक सुखावले असून वातावरणात गारवा निर्माण झालेला आहे. दिवसभर पाऊस कायम राहण्याचा नागपूर वेध शाळेने अंदाज दिलेला आहे. येत्या काही तासात विदर्भातील नागपूरसह अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, सौम्य ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची तसच वाशीम, बुलढाणा, गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवली आहे.

---------------------------------------------------

**नागपूर विधानभवन**

नागपूरमधील विधानभवनच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीच्या आराखड्याचे आज सादरीकरण करण्यात आले. विस्तारीकरण व प्रस्तावित इमारतीचे काम भव्यदिव्य असे व्हावे, असे विधानसभा अध्यक्ष ॲड.राहूल नार्वेकर यांनी यावेळी सांगितले. नागपूरमधील सध्या अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या जागेवर नवीन सात मजल्याचे संकुल उभारण्यात येणार असून हे विस्तारीकरण करताना सध्याच्या इमारतीची ऐतिहासिक शैली अबाधित राहिल याची काळजी घेण्यात येणार आहे.

---------------------------------------------------

**शांतीनगर कावरापेठ रेल्वे उड्डाण पूल**

नागपूर शहरातील शांतीनगर कावरापेठ रेल्वे उड्डाण पूल आणि कळमना ते राजीव गांधीनगर पुलाच्या आराखड्याची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता स्तरावर चौकशी केली जाईल. या चौकशीत दोषी आढळणाऱ्या एजन्सी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

---------------------------------------------------